# बौद्ध समाजातील स्त्रियांच्या समस्या

**प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे**
वसंतराव नाईक महाविद्यालय,
म्हसळा-रायगड ९४२११६६९९९, ८४२१६५४४०२

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळी हिंदुस्थानात मातृसत्ताक पद्धत होती. परंतु पुढील काळात मातृसत्ताक पद्धतीची जागा पितृसत्ताक पद्धतीने घेतली. पुरुषप्रधान संस्कृती सुरू झाली. त्यामुळे हिंदू धर्मातील स्त्रियांची परिस्थितीही वाईट झाली. या वेळी हिंदुस्थानात बौद्ध धर्माचा विस्तार फारच कमी प्रमाणात झाल्यामुळे आजचे बौद्धही त्यावेळी हिंदूंप्रमाणेच आपले रीतिरिवाज पाळत होते. त्यामुळे हिंदू रीतिरिवाजांप्रमाणे यांच्याही स्त्रियांना त्रास सहन करावा लागत होता. स्त्रियांना असलेले अधिकार मध्ययुगात संपुष्टात आले. 'चूल आणि मूल' हेच स्त्रियांचे कर्तव्य ठरले. चार भिंतीच्या आत स्त्रीने राहावे हीच स्त्रियांबद्दल समाजाची धारणा झाली. स्त्री ही पुरुषांची दासी आहे असे म्हटले जाई. शिवाय त्यांच्या समस्या ह्या वाढत गेल्या, त्यामध्ये बालविवाह, विधवाप्रश्न, मुलींची हत्या करण्याची परंपरा असे अनेक प्रश्न या काळात निर्माण झाले. दरम्यान ब्रिटिशांनी या देशात शाळा काढल्या व शिकल्या-सवरलेल्यांना स्त्रियांच्या समस्यांची खरी जाणीव झाली.

**अ) दलितांची स्त्री म्हणून अवहेलना :-**

बौद्ध स्त्रिया या इतर हिंदू स्त्रियांप्रमाणेच आपले जीवन व्यतीत करीत असतात. परंतु त्यांच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन मात्र वेगळा दिसतो. केवळ दलित म्हणून आणि स्त्री म्हणून होणाऱ्या दुहेरी शोषणाचा जाच दलित महिलांना होता. त्याबरोबरच लिंगाधारित मुद्द्यांवर त्यांचे शोषण होते आणि लैंगिक अत्याचारासमोर त्या हतबल होतात असे अनुसूचित जाती-जमातीच्या संयुक्त संसदीय अहवालात म्हटले आहे. 'इंटरनॅशनल दलित सॉलिडॅरिटी नेटवर्क'ने स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या हिंसेला नऊ भागांमध्ये विभागले होते. त्यांच्यापैकी सहा भाग त्यांच्या जातीच्या आधारावर अवलंबून होते आणि तीन भाग लिंगाधारित गोष्टींवर. जातीच्या नावावर शिवीगाळ, मारहाण, लैंगिक हिंसाचार अशा अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते. बालविवाहामुळे लैंगिक हिंसाचार आणि घरगुती हिंसेचा सामना करावा लागतो. तसेच या काळात विधवांचा पुनर्विवाहाचा हक्क नाकारला गेल्याने समाजात विधवा विवाहांचा प्रश्न निर्माण झाला होता.

**ब) दलित स्त्रियांना हलक्या दर्जाची कामे :-**

दलित स्त्रियांकडे त्यांची जात पाहून पाहिले जाते. एखादी अशिक्षित स्त्री जर काम मागायला गेली तर तिला घरातील गुरांचा गोठा साफ करणे, भांडीकुंडी धुणे, संडास साफ करणे, कचरा काढणे, कपडे धुणे इत्यादी घरकामे दलित स्त्रियांना करावी लागतात. शिवाय वेतन ठरविण्याचा अधिकारही घरमालकाचाच असतो, त्यामध्ये ती भाग घेऊ शकत नाही. तसेच एखादी स्त्री थोडी शिकली असेल तर ती ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेत नोकरी मागते; परंतु तिला ऑफिसमधली नोकरी न देता रस्ता साफ करणे, कचराकुंड्या साफ करणे, गवत काढणे, बाजारपेठा स्वच्छ करणे, गटारी साफ करणे इत्यादी कामे त्यांना दिली जातात. शिवाय एखाद्या स्त्रीने जर कामाच्या दर्जावरून प्रतिप्रश्न केला तर तिला उलट विचारले जाते की, मग ही कामे कोण करणार? तुमच्याच जातीच्या स्त्रिया या अशा प्रकारच्या कामात माहीर आहेत तेव्हा तुम्हीच ते काम करा. म्हणजेच बौद्ध स्त्री कितीही शिक्षित असली तरी तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा जातीयवादी व पारंपरिक असलेला दिसतो. आजमितीस महाराष्ट्राचा विचार करता ७० टक्के ग्रामपंचायतींत व ८० टक्के नगरपालिकेत स्वच्छतेसाठी या बौद्ध स्त्रियाच पहावयास मिळतील.

**क) बौद्ध स्त्रियांची आर्थिक स्थिती :-**

आज आधुनिक युगाचा प्रारंभ झाला असला तरी पाहिजे तेवढ्या प्रमाणात दलित स्त्रियांची आर्थिक बाबतीत तितकीशी प्रगती झाल्याचे दिसून येत नाही. आजही बौद्ध स्त्री ही आपल्या कुटुंबाच्या दबावाखाली राहते व आपल्या विवाहानंतर 'चूल व मूल' या प्राचीन रूढीप्रमाणे आपले कुटुंब चालवत असते. तर काही सुशिक्षित स्त्रिया ज्या नोकरदार महिला म्हणून समाजात वावरत असतात, त्याही आपल्या कुटुंबातच पैसा खर्च करीत असताना दिसून येतात. बौद्ध समाजामध्ये अजूनही उच्चशिक्षणाचे प्रमाण स्त्रियांमध्ये कमी आहे. अल्पशिक्षणामुळे नोकरी-धंदाही अल्प उत्पन्नाचाच मिळतो, म्हणजेच त्यांची आर्थिक स्थितीही बेताचीच राहते. शिवाय कौटुंबिक वातावरणामुळे काही स्त्रिया उच्च दर्जाच्या नोकऱ्या ह्या फार दूर अंतरावर असल्याने त्या सोडून देतात, परिणामी उच्च आर्थिक गटात त्या जात नाहीत. शिवाय पुरुषमंडळीही शेतकऱ्यांच्या शेतात व घरी आणि सरकारी दरबारी राबत असतात.

आजच्या काळात बौद्ध स्त्रियांनी उच्च नोकरीतील पदे पादाक्रांत केली पाहिजेत, तसेच लघु व कुटीर उद्योगांकडे वळले पाहिजे; म्हणजेच नोकरी घेणारे नव्हे तर देणारे बनले पाहिजेत, म्हणजेच बौद्ध स्त्रिया या उद्योगधंद्याकडे वळल्या पाहिजेत. तसेच आपल्याकडे जर थोडीफार शेती असेल तर त्या शेतीमध्ये आधुनिकता आणून जास्तीत जास्त उत्पादन कसे करता येईल त्याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. शिवाय आपली आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी स्त्रियांनी व्यापाराकडेही वळले पाहिजे. व्यापार हा पूर्वीसारख्या पद्धतीने न चालता तो ऑनलाईन पद्धतीने चालतो. म्हणजेच स्त्रीने आपले घर किंवा ऑफिस न सोडता व्यापार करता येतो. जेणेकरून आपली सांपत्तिक स्थिती सुधारली जाईल, स्त्रिया स्वावलंबी होतील व आपल्याकडे बघण्याचा समाजाचा जो दृष्टिकोन आहे तो बदलेल. तसेच पूर्वी जे आपले शोषण

होत होते तेही कमी होऊ शकेल. परंतु बहुसंख्य दलित अजूनही वाईट अवस्थेत आहेत, त्यांच्यातील गरीब-श्रीमंत लोकांमधील दरी मात्र रुंदावत आहे. काही बौद्ध वृद्ध स्त्रियांना राहण्यास चांगले घर नाही. त्यांना काम मिळण्याची संधी नाही. त्यांना आपल्या सुनांवर अवलंबून राहावे लागते. पुरुष मंडळी पुष्कळ पैसा दारूवर खर्च करतात. बहुतेक वेळा आवश्यक त्या भाज्या व तेल घ्यायलाही पैसे नसतात.

**ड) राजकीय जागृती :-**

डॉ. बाबासाहेबांना माहीत होते की, जोपर्यंत बौद्ध समाज एक होत नाही तोपर्यंत आपली शक्ती, विशेषतः राजकीय शक्ती दिसणार नाही. शिवाय आपल्या विरुद्ध अन्यायकारक असणारे व मानवी मूल्यांचे अपहरण करणारे कायदे बदलायचे असतील तर ते कायदेमंडळातच, त्यासाठी कायदेमंडळातील आपली ताकद वाढविली पाहिजे असे बाबासाहेबांचे विचार होते. पण आजच्या बौद्ध स्त्रियांना मात्र कायदेमंडळात जाण्यासाठी अनेक टप्पे पार पाडावे लागतात व ते टप्पे पार करीत असताना अनेक कुचंबणा सहन कराव्या लागतात. त्यातूनही एखादी-दुसरी कायदेमंडळात गेल्यास तिला काही मर्यादा येतात. जेव्हा निवडणुका येतात तेव्हा बहुतेक दलित स्त्रिया कोणत्या पक्षाला मत द्यावे हे ठरवू शकत नाहीत. बौद्ध समाजात बऱ्याच प्रमाणात पुरुष ज्या पक्षाला मत देणार असतील त्याच पक्षाला स्त्रियाही मत देतात. बौद्ध स्त्रिया अजूनही मोठ्या प्रमाणात राजकीय बाबतीत जागृत झाल्याचे दिसून येत नाही. 'आम्हाला त्याचा काय फायदा? आमच्यासाठी काहीही बदलत नाही, आमच्यासाठी कोणीही काही करत नाही. मग ती रिपब्लिकन पार्टी असो की काँग्रेस.'

बौद्ध स्त्रियांना 'राखीव' जागांचा फायदा घेऊन विधिमंडळात प्रवेश करण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. परंतु त्या आपल्याला हवा तो कायदा करू शकत नाहीत. किंवा त्यावर त्या मनमोकळेपणाने आपले विचार मांडू शकत नाहीत. एक तर त्यांना भीती असते की, आपला पती काय म्हणेल, त्याला काय वाटेल, त्याला काही त्रास तर होणार नाही ना. दुसरा विचार म्हणजे आपला पक्ष, आपल्या पक्षाची भूमिका काय आहे हेही तिला पहावे लागते, त्यातूनही ती जर वेगळ्या विचारधारेच्या पक्षाकडून निवडून आली असेल तर मात्र अशा स्त्रियांची मोठीच कुचंबणा होते.

**संदर्भ**

१) शहा जी. बी. - आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथम आवृत्ती २०१४, पृ. ३३४

२) कठारे अनिल - शिवकाळ व पेशवेकाळातील महारांचा इतिहास, कल्पना प्रकाशन, प्रथम आवृत्ती २००२, पृ. ४७

३) विद्या भाके - आधुनिक भारतातील दलित, डायमंड पब्लिकेशन, पृ. २०११

४) कित्ता - पृ. २१४